## निशाणी २६ लगत न्यायनिर्णय
## (दिनांक ०४/१२/२०२३ रोजी घोषीत)

१. साक्षीदारांचे जाब जबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. सदर मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का की, दिनांक १५/११/२०१८ रोजी चिंचणी वांगी रोडवर, वांगी, ता. कडेगांव, जि. सांगली येथे आरोपी त्याच्या ताब्यात १८० मिली च्या ११ देशी दारुच्या बाटल्या बाळगताना मिळून आला? | **नकारार्थी** |
| २ | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

२. अभियोग पक्षाने खालील साक्षीदार तपासलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| साक्षीदार क्र.१ | सुनिल शिवाजी लोहार | फिर्यादी | निशाणी १६ लगत |

३. अभियोग पक्षाने खालील कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे.

| | |
|---|---|
| फिर्याद | निशाणी २८ |
| नमुनावाहक पत्र | निशाणी २९ |

**मुद्या क्रमांक १ करिता –**

४. साक्षीदार क्र. १ हे फिर्यादी असून त्यांनी सरतपासात असे कथन केले की,

दि. १५/११/२०१८ रोजी ते रा.उ.शु.विटा येथे नेमणूकीस असताना मिळालेल्या माहितीवरुन सोनहिरा कारखान्याजवळ, चिंचणी वांगी रोडवर, वांगी येथे गेले. त्यांनी आरोपीच्या ताब्यातून देशी दारुच्या १८० मिलीच्या ११ बाटल्या जप्त केल्या व फिर्याद दाखल केली.

६. अभियोगपक्षामार्फत साक्षीदार क्र.१ ने आरोपीच्या ताब्यातून १८० मिलीच्या देशी दारुच्या बाटल्या जप्त केल्या असे कथन केले असले तरी या घटनेबाबत साक्ष देणारा अन्य कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाने नोंदविलेली नाही. साक्षीदार क्र.१ याने तो घटनास्थळी कोणत्या वाहनाने गेला, किती वाजता गेला व आरोपी निश्चीत कोठे थांबला होता याबाबत सरतपासात काहीही कथन केलेले नाही.

७. प्रस्तुत खटल्यात रासायनिक विश्लेषण अहवाल दाखल आहे. परंतू आरोपीच्या ताब्यातून देशी दारुच्या बाटल्या जप्त केल्यानंतर त्या कोठे व कोणत्या परिस्थितीत जतन करुन ठेवल्या होत्या याबाबत कोणताही पुरावा अभियोगपक्षाने दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रस्तुत खटल्यात दाखल असलेला रासायनिक विश्लेषण अहवाल हा प्रस्तुत खटल्यातील जप्त मुद्देमालाबाबतचा आहे ही बाब सिध्द होत नाही.

८. अभियोगपक्षाच्या पुराव्याचा विचार करता, आरोपीच्या ताब्यातून देशी दारुच्या १८० मिलीच्या ११ बाटल्या जप्त केल्या असे सांगणाऱ्या साक्षीदार क्र.१ च्या पुराव्यास दुजोरा देणारा अन्य पुरावा दाखल नाही तसेच आरोपीच्या ताब्यातून देशी दारुच्या १८० मिलीच्या ११ बाटल्या जप्त केल्या असे सांगणारा कोणताही स्वतंत्र साक्षीदार

तपासलेला नाही. तसेच अभियोगपक्षामार्फत पंच, तपासी अंमलदार यांना तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातून देशी दारुच्या १८० मिलीच्या ११ बाटल्या जप्त केल्या हे संशयापलीकडे सिध्द होत नाही. म्हणुन मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्रमांक २ करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) आरोपी अशोक किसन पवार, वय – ३८, रा. वांगी, ता.कडेगांव, जि.सांगली यांस मुंबई दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) अन्वयेच्या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२) आरोपीचा जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) जप्त मुददेमाल म्हणजेच देशी दारुच्या १८० मिलीच्या ११ बाटल्या अपील कालावधीनंतर दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सांगली यांचेकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावणेकामी पाठविणेत यावे तसेच जप्त असणारी पिशवी मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर नाश करणेत यावे.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये रक्कम रु.५,०००/– (पाच हजार रुपये मात्र) रुपयाचा वैयक्तिक जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

स्वाक्षरी/– xxx

दिनांक–०४/१२/२०२३

( **प्राजक्ता रा. सबनीस** )

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कडेगांव

## प्रमाणपत्र

मी हमी देते की, सदरच्या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | अभिजित रा. खटावकर |
| न्यायालय | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कडेगांव. |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | ०४/१२/२०२३ |
| न्यायीक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | ०४/१२/२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | ०४/१२/२०२३ |